माहितीचा अधिकार

# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
## बृहन्मुंबई खंडपीठ

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

**अपील क्र. MHSICMU/२०२३/M/००२३३७**

**अपिलार्थी श्री. प्रदीप जी. तिवारी**

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा सहकारी अधिकारी श्रेणी-२**
झोपडपट्टी पुनवर्सन प्राधिकरण, प्रशासकीय इमारत, सहकार कक्ष,
अनंत काणेकर मार्ग, बांद्रा (पू), मुंबई-५१

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक निबंधक**
झोपडपट्टी पुनवर्सन प्राधिकरण, प्रशासकीय इमारत, सहकार कक्ष,
अनंत काणेकर मार्ग, बांद्रा (पू), मुंबई-५१

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : २१.०४.२०२५**

अपीलकर्ता : उपस्थित
विद्यमान जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपिलीय अधिकारी : अनुपस्थित

| मूळ अर्ज दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याचा उत्तराचा दिनांक | प्रथम अपील दिनांक | प्रथम अपील आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| २४.०१.२०२३ | १०.०३.२०२३ | २१.०३.२०२३ | ०६.०६.२०२३ |

अपिलार्थी यांनी आयोगाकडे दि. ३०.०६.२०२३ रोजीच्या अर्जांन्वये माहिती मिळालेली नाही असे कारण नमूद करुन द्वितीय अपील दाखल केले आहे.

द्वितीय अपील अर्जासोबत अपिलार्थी यांनी प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेश दि.०६.०६.२०२३ संलग्न केले आहेत.

अपिलार्थी यांनी दि. २४.०१.२०२३ रोजीच्या माहिती अर्जानुसार पुढील माहितीची मागणी केलेली होती: *(1) Furnished true copy of required under of information regarding the Sai Durga SRA CHS registered no. MUM/SRA/HSG/(TC)/11905/2010. Under the bye laws no. 157(e) of Maharashtra co-op. Housing Society Act 1960. According passed The Special General Body Resolution by Appoint The Atchitect M/S. Aakar Architect Licences Surveyor Mr. Jitendra Patel so please furnished the Sai Durga SRA CHS registered society GBR copy as per MCS Act 1960 Under bye laws no. 157(e) Accoeding so Furnished the copy under RTI Act 2005 U/S. 7 (2) Law According. (2) Furnished true copy of required the information related Furnished the copy of special GBR passed by The Sai Durga SRA CHS registered Society the Special General Annual Body Resolution copy be four granted the plinth commitment certificate copy (cc) by SRA Engineering Depatment submitted by Developer & Architect said department than issued the CC copy said projects according by Engineering Departments so Furnished the Special GBR copy.*

..२/-

जन माहिती अधिकारी यांच्याकडून उत्तर प्राप्त झाले नाही म्हणून अपिलार्थींनी दि. २१.०३.२०२३ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि. ०६.०६.२०२३ रोजी प्रथम अपील अंशत: मान्य करुन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थींनी मागणी केलेली माहिती या विभागाच्या अभिलेखात उपलब्ध असल्यास देण्यात यावी असे आदेशित करुन प्रथम अपील निकाली काढलेले आहे.

सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित असून जन माहिती अधिकारी यांनी त्यांचे व प्रथम अपिलीय अधिकारी यांचे संयुक्त स्वाक्षरीचे लेखी निवेदन दि. २४.०१.२०२५ आयोगासमोर सादर करुन नमूद केले की, त्यांनी दि. १०.०३.२०२३ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थींना मुद्देनिहाय उत्तर दिलेले होते. तसेच, अभियांत्रिकी विभाग यांच्याकडून प्राप्त पत्राच्या अनुषंगाने दि.०१.०६.२०२३ माहिती अर्जातील मुद्दा क्र. २ च्या अनुषंगाने अपिलार्थींना कळविण्यात आले आहे की, सदरची जीबीआर कॉपीची माहिती ही या कार्यालयाच्या अभिलेखात उपलब्ध नसल्याने देता येत नाही.

अपिलार्थी यांनी सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाचे शासन निर्णय दि. ०४.०७.२०१९ आयोगासमोर सादर करुन नमूद केले की, वास्तुविशारद/ प्रकल्प व्यवस्थापक सल्लागार यांना नियुक्ती पत्र देणेसाठी विशेष सर्वसाधारण सभेचा ठराव अवश्यक आहे. जेव्हा सदर संस्थेच्या बांधकाम झालेले आहे. तर जीबीआर शिवाय सदर संस्थेने वास्तुविशारद/ प्रकल्प व्यवस्थापक सल्लागार कसे नेमले.

अपिलार्थी यांनी आयोगास सादर केले की, सदर संस्थेच्या कामात अनेक त्रुटी आहेत, सदर विषय माहिती अधिकार अधिनियमाच्या व्याख्येत येत नाही.

या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग या निष्कर्षावर येत आहे की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थींना उत्तर दिलेले आहे. सबब आयोग पुढील आदेश देत आहे:

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

State Information Commission Greater Mumbai

**मुंबई**
**दिनांक : २२.०४.२०२५**